अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

आज नरक चतुर्दशी

दे धक्का!!




www.surajyadigital.com । गुरुवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२४ । वर्ष : २३ वे अंक : ३३ वा किंमत : ५ रुपये पाने १२

# दोन देशमुख, चार अभिजीत पाटील, दोन रणजीत शिंदे, तीन संजय शिंदे!

# डुप्लीकेटस्

## असली ... नकली ... पैचान कौन !

✔ सोलापूर / विशेष प्रतिनिधी

**एक नाम के दो - चार बंदे असली कौन और नकली कौन? पैचान कौन?**

**सोलापूर जिल्ह्यात अनेक विधानसभा मतदारसंघामध्ये एकाच नावाच्या अनेक व्यक्तींची उमेदवारी दाखल झाल्याने असली उमेदवारांची डोकेदुखी वाढली आहे. नावातील आणि चिन्हातील साधर्म्यामुळे नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत अनेक उमेदवारांना फटका बसला होता, आता विधानसभेच्या निवडणुकीतही अशाच प्रकारची गंभीर समस्या अनेक उमेदवारांपुढे उभी ठाकलीय!**

माढा मतदारसंघात अभिजीत पाटील नावाचे चार, रणजीत सिंह शिंदे नावाचे दोन उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. तर करमाळ्यात तीन संजय शिंदे रिंगणात उतरले आहेत. नावात साधर्म्य असलेल्या या उमेदवारांमुळे अधिकृत उमेदवारांची डोकेदुखी वाढणार यात काही शंका नाही.

माढा विधानसभा मतदारसंघात उमेदवारी अर्जाची मुदत संपल्यानंतर नवी खेळी समोर आली आहे. पवार गटाकडून अभिजीत पाटील यांना तुतारी मिळाल्यानंतर अभिजीत पाटील नावाचे चार उमेदवार माढ्याच्या निवडणूक रिंगणात उतरले आहेत. तशीच परिस्थिती आमदार शिंदे यांचे पुत्र रणजितसिंह शिंदे यांच्या बाबतही होत आहे. रणजितसिंह शिंदे नावाचे दोन उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. करमाळा मतदारसंघातही आमदार संजय मामा शिंदे हे अपक्ष उमेदवार आहेत. त्यांच्याविरोधात त्यांच्याच नावाचे तीन उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत.

एकंदरीत नावाच्या साधर्म्यामुळे ज्या पद्धतीनं एकाच नावाचे अनेक उमेदवार रिंगणात असल्यानं मतदारांचा संभ्रम करण्याचा हा प्रकार असतो. त्यात माढ्यात चुरस जास्त असल्याने माढ्यातील चार अभिजीत पाटलांपैकी तुतारीच्या अभिजीत पाटलांना किती फटका बसणार? हेही पाहावं लागणार आहे.

तशीच परिस्थिती आमदार शिंदे यांचे पुत्र आणि अपक्ष उमेदवार रणजितशिंदे यांच्या बाबतही होणार असून दोन रणजीत शिंदे निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे आमदार शिंदे यांच्या मुलाला फटका बसणार का? हेदेखील पाहणे महत्त्वाचं असणार आहे.

माढा मतदारसंघात शरद पवार यांच्याकडून अभिजीत पाटील यांना उमेदवारी मिळाल्यानंतर अभिजीत धनंजय पाटील यांनी बहुजन समाज पार्टीच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. याशिवाय अभिजीत अण्णासाहेब पाटील, अभिजीत तुळशीराम पाटील असे चारजण एकाच नावाचे उमेदवार माढ्यात निवडणूक रिंगणात उतरले आहेत.

आमदार बबनदादा शिंदे यांचे पुत्र रणजीत सिंह शिंदे हे अपक्ष निवडणूक लढवीत असताना येथूनच रणजीत मारुती शिंदे यांनीही अपक्ष उमेदवारी दाखल केली आहे.

करमाळा विधानसभा मतदारसंघात आमदार संजय मामा विठ्ठलराव शिंदे हे अपक्ष निवडणूक रिंगणात असून येथूनच संजय लिंबराज शिंदे आणि संजय वामन शिंदे अशा दोघांनी उमेदवारी दाखल केली आहे. लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या तुतारीला साधर्म्य असणाऱ्या पिपाणी या चिन्हामुळे शरद पवार गटाला अनेक मतदारसंघात मोठा फटका बसला होता. आता नावात साधर्म्य असणाऱ्या उमेदवारांची संख्या वाढल्यानं मतदारांचा संभ्रम देखील वाढणार आहे.

### शहर उत्तरमध्ये आणखी एक कोठे

शहर उत्तरमध्ये कोठे आडनावाच्या व्यक्तीने उमेदवारी अर्ज भरला आहे. त्यामुळे पवार गटाचे उमेदवार महेश कोठे यांनी ही येथील आमदाराची जाणीवपूर्वक खेळी असल्याचा आरोप केला. विशेष म्हणजे कोठे आडनावाच्या व्यक्तीने पिपाणी चिन्हाची मागणी केली आहे.



### नाव आणि चिन्ह मतदारांपर्यंत पोहोचवावे लागणार

डमी उमेदवारांमुळे मतदारांना हवा असणारा नेमका उमेदवार शोधताना एकतर त्याचं नाव लक्षात ठेवावे लागणार आहे किंवा त्यांचं चिन्ह तरी डोक्यात ठेवावं लागणार आहे. निवडणुकीतल्या या खेळी अनेक वर्षांपासून चालत आल्या असल्या तरी काही वेळेला मुख्य उमेदवाराला याचा फटका बसलेला दिसला नाही. त्यामुळे शरद पवार गटाचे अभिजीत पाटील असतील किंवा अपक्ष आमदार संजय मामा शिंदे असतील, यांना आपलं नाव आणि चिन्ह मतदारांपर्यंत पोहोचवताना मोठी काळजी घ्यावी लागणार आहे.

### दोन सुभाष देशमुखांचे अर्ज बाद

सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातून भाजप उमेदवार आ. सुभाष देशमुख हे निवडणूक रिंगणात आहेत. त्यांच्या नावाशी साधर्म्य असणाऱ्या देशमुख सुभाष रंगनाथ, देशमुख सुभाष अण्णाराव या दोन उमेदवारांनी अपक्ष उमेदवारी दाखल केले होते. त्यामुळे भाजपच्या देशमुख यांची डोकेदुखी वाढली होती. बुधवारी उमेदवारी अर्ज छाननी दिवशी सुभाष रंगनाथ देशमुख व सुभाष अण्णाराव देशमुख या दोन पक्ष उमेदवारांचे अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने नामंजूर केले त्यांच्या अर्जावर दहा सूचकांच्या सह्या नव्हत्या.

# खा. प्रणिती शिंदे बनल्या काँग्रेसच्या 'स्टार' प्रचारक

✔ मुंबई/प्रतिनिधी

राज्यात विधानससभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. एकाच टप्प्यात निवडणुका पडणार असून २० नोव्हेंबर रोजी मतदान पार पडणार आहे. तर २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर करण्यात येणार आहे. अशातच आज काँग्रेसची स्टार प्रचारक यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये राहुल गांधी सोनिया गांधी यांच्यासह सोलापूरच्या खा. प्रणिती शिंदे यांचा समावेश आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसला विशेषत: महाराष्ट्रात चांगले यश मिळाले आहे. या यशानंतरच काँग्रेसचा आत्मविश्वास वाढला आहे. राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा सुद्धा विजयासाठी कारणीभूत ठरली होती. त्यामुळे विधानसभा निवडणुकीतही जास्तीत जास्त आमदार निवडून आणण्याचा प्रयत्न हा काँग्रेसचा असणार आहे. त्यासाठी स्टारप्रचारक नेमण्यात आले आहेत. त्यामुळे खा. शिंदे यांचा समावेश आहे.

### काँग्रेसच्या स्टार प्रचारकांची यादी

मल्लिकार्जुन खरगे,राहुल गांधी, सोनिया गांधी, खा. प्रणिती शिंदे, अलका लांबा, के. जे. जॉर्ज, श्री के. जयकुमार, प्रियांका गांधी, जिग्नेश मेवाणी, के.सी. वेणुगोपाल, नदीम जावेद, रमेश चेन्निथला, सलमान खुर्शीद, अशोक गेहलोत, राजीव शुक्ला, मुकुल वासनिक, नाना पटोले, अविनाश पांडे, बाळासाहेब थोरात, सिद्धरामय्या, विजय वडेट्टीवार, भूपेश बघेल, पृथ्वीराज चव्हाण, रेवंथ रेड्डी, चंद्रकांत हांडोरे, चरणजित सिंग चन्नी, वर्षा गायकवाड, डी.के. शिवकुमार, रणदीप सुरजेवाला अमित देशमुख, विश्वजीत कदम.





## बड्या नेत्यांकडून प्रचाराचा धुराळा

# सोलापुरात शहा, योगी, गडकरींच्या सभा

✔ सोलापूर/प्रतिनिधी







राज्यात विधानसभा निवडणुकीचा रणसंग्राम रंगणार आहे. २० नोव्हेंबरला होणाऱ्या निवडणुकीसाठी सर्व पक्षांकडून जोरदार तयारी सुरु आहे. महायुतीच्या जागावाटपाला आता पूर्णविराम लागला आहे. त्यामुळे लवकरच प्रचाराचा नारळ फोडला जाणार आहे. यामध्येच भाजप बडे नेत्यांकडूनही प्रचाराचा धुरळा उडवला जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या राज्यात सलग ८ दिवस मॅरेथॉन सभा होणारच आहेत. पण यासोबतच महायुतीच्या उमेदवारांसाठी केंद्रीय मंत्री अमित शहा देखील महाराष्ट्रात तंबू ठोकणार आहेत. दरम्यान, सोलापुरात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, वाहतूक मंत्री नितीन गडकरी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभा होणार आहेत.

विधानसभा निवडणुकीत यंदा महायुतीच्या महायुतीतील घटक पक्षांच्या प्रमुख नेत्यांसोबतच पक्षश्रेष्ठींचाही कस लागणार आहे. जास्तीत जास्त जागा खेचून आणण्यासाठी जोर लावावा लागणार आहे. त्यासाठीच महायुतीकडून नियोजन केले जात आहे. महाराष्ट्राची प्रचाराची धुरा भाजपच्या बड्या नेत्यांच्याच हाती असणार आहे. त्यामुळे पंतप्रधान मोदींच्या आयोजित ८ सभांच्या दुप्पट सभा केंद्रीय मंत्री अमित शहा घेणार आहेत.

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात भाजपाचे सहा उमेदवार आहेत. शहरातील तिन्ही जागा भाजपाकडे आहेत. त्यासाठी सोलापुरात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, वाहतूक मंत्री नितीन गडकरी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभा होणार आहेत. अमित शहांच्या एकूण २० सभा आयोजित करण्यात आल्या आहेत. त्यातील एक सोलापुरात होणार आहे.

### मध्य मध्ये पुन्हा योगी आणि टी. राजांच्या सभा

लोकसभा निवडणुकीत शहर मध्य मतदारसंघात उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि आ. टी राजा यांच्या सभा झाल्या होत्या. आता पुन्हा एकदा या दोघांच्या सभा या मतदारसंघात होणार आहेत. त्याबाबतचे पत्र प्रदेशकडे पाठवण्यात आले आहे.

# स्थानिक पदाधिकाऱ्यांचा दबाव कामी आला

# पंढरपुरात अनिल सावंतांना 'एबी'फॉर्म मिळाला

✔ पंढरपूर-मंगळवेढा/प्रतिनिधी

**मतदार संघातील राष्ट्रवादीच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी केलेले गेल्या पंधरा दिवसातील प्रयत्न, जनतेच्या मनातील भावनेचा विचार करून अनिल सावंत यांना महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून एबी फॉर्म मिळाला. भगीरथ भालके यांना महाविकास आघाडी कडून फॉर्म दाखल करण्यास सांगितल्यानंतर दोन दिवसात घडलेल्या घडामोडीमुळे अनिल सावंत यांना फॉर्म भरण्यास सांगितले गेले अनिल सावंत यांच्याकडे यापूर्वी केलेल्या सामाजिक उपक्रमाबरोबर भैरवनाथ परिवाराची साथ त्यांच्यासोबत राहणार आहे तर भगीरथ भालके यांच्यासाठी वडिल स्व. भारतनानाचा वारसा व विठ्ठल परिवाराची भूमिका महत्वाची ठरणार आहे.**

सध्या या विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट व काँग्रेसकडून देखील एबी फॉर्म देऊन अर्ज दाखल केले आहे त्यामुळे आघाडीत पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात चांगली बिघाडी झालेली पाहावयास मिळत आहे परंतु चार तारखेपर्यंत अर्ज काढून घेण्याची मुदत असल्यामुळे येत्या काही दिवसात काय घडामोडी घडतात यावरून आघाडीत बिघाडी होते का हे कळणार आहे . पूर्वीपासून राष्ट्रवादीचा विचारांचा हा मतदारसंघ राहिला आहे या ठिकाणी शरद पवारांना मानणारा मोठा वर्ग आहे परंतु महाविकास आघाडीतील गोंधळामुळे भाजपचे उमेदवार समाधान आवताडे हे निवडणुकीच्या रणांगणामध्ये सरस असल्याचे दिसून येत आहेत.

स्थानिक कार्यकर्त्यांना विचारात घेऊन शरद पवारांनी पंढरपूर मंगळवेढा चा निर्णय घेतल्यामुळे स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवाराला मताधिक्य देण्याची जबाबदारी पार पाडल्यामुळे भगीरथ भालके हे राष्ट्रवादी काँग्रेसकडून इच्छुक होते. त्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. मात्र त्यांना वेळेत एबी फॉर्म देण्याबाबत राष्ट्रवादी शरदचंद्र पक्षाने भूमिका न घेतल्याने ऐनवेळी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला ४५ हजाराचे मताधिक्य राहिल्यामुळे आत्मविश्वास वाढलेल्या काँग्रेसच्या वरिष्ठाकडून ही जागा महाविकास आघाडीत काँग्रेसने पदरात पाडून घेतली व भगीरथ भालके यांना उमेदवारी दिली



यामुळे पंढरपूर व मंगळवेढ्यातील संतप्त राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी पवारांकडे ही जागा आपल्यालाच राहावी यासाठी अट्टाहास धरला व मोहिते पाटलांच्या माध्यमातून पंढरपूर विधानसभेसाठी फिल्डिंग लावत अनिल सावंत यांना उमेदवारी मिळावी यासाठी पंढरपूर मधून सुभाष भोसले संदीप मांडवे तर मंगळवेढ्यातून राहुल शहा, चंद्रशेखर कोंडूभैरी, प्रथमेश पाटील, माणिक गुंगे संतोष रंदवे, अण्णा शिरसाट हे सातत्याने प्रयत्नशील होते. प्रसंगी राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी मुंबईत तळ ठोकला कार्यकर्त्यांनी केलेल्या आग्रही मागणीचा विचार करत.अनिल सावंत यांना राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे उमेदवारी देण्यात आली.